# VIVEK TUTORIALS

X (English)

(Prelim)

Marathi-(All)

DATE: 11-02-19

TIME: 3 hour

MARKS: 100

SEAT NO:

विभाग १ - गदय

Q.1 (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1 A1) i) कारणे लिहा 1

वाघिणीने मंदपणे गुरगुरत नापसंती व्यक्त केली, कारण ..............

ii) विधान पूर्ण करा. 1

1) एका पिल्लानं बाजूच्या जांभळीच्या झाडीतून ..............

2) एक वर्षाचा वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की .................

"ऑऽ व्हऽऽ" अचानक नाल्याच्या पलीकडून आलेल्या या बारीक आवाजानं मी जागीच थबकलो. माझ्या अंगावर सरसरून काटा आला. एक वर्षाच्या वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की हा वाघिणीचा आवाज आहे. ती या आवाजानं आपल्या पिल्लांना बोलवत असावी. अचानक पाण्यात 'धपकन' काहीतरी पडल्याचा आवाज आला. मी पाणवठ्याकडं पाहिलं आणि आश्चर्यानं थक्कच झालो. एका पिल्लानं बाजूच्या जांभळीच्या झाडीतून थेट पाण्यात उडी घेतली होती. लगेच त्याच्या पाठोपाठ उरलेली तीनही पिल्लं धपाधप पाण्यात उतरली. आईचा आश्वासक आवाज त्यांच्या करता उत्साहाचं वारं भरणारा ठरला होता.

वाघीण रात्रीच पिल्लांना नाल्या काठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीसाठी गेली होती. या परिसरात दुसरे नर वाघ, बिबळा, रानकुत्री अशा पिल्लांच्या संभाव्य शत्रूंचा राबता होताच. त्यामुळं तिला ही खबरदारी घेणं आवश्यकच होतं. वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो. त्यामुळं वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल भलतीच दक्ष असते. आता ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लां जवळ परत आली होती. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं खेळकरपणे तिच्याकडं झेपावली होती. तेवढ्यात नाल्याच्या डावीकडच्या विरळ बांबूमधून मला वाघीण येताना दिसली. ती सरळ पाण्याजवळ आली आणि वळून पाण्यात बसली. रात्रभरच्या वाटचालीनं थकून ती विश्रांती घेत होती; पण पिल्लांच्या उत्साहाला आई बघताच उधाण आलं होतं. त्यां तील एका पिल्लानं तर वाघिणीच्या पाठीवरच उडी घेतली; पण तिथून घसरल्यानं ते धपकन पाण्यात पडलं. तोंडावर पाणी उडताच वाघिणीनं मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली; पण पिल्लांना त्याच्याशी काहीच देणं-घेणं नव्हतं. त्यांचा आईच्या भोवती जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

A2) चौकटी पूर्ण करा 2

1) वाघिणीचा पिल्लांना बोलवल्याचा आवाज [ ]

2) पाण्यात पडल्याचा होणारा आवाज [ ]

3) वाघिणीची पिल्लांवर गुरगुरण्याची क्रियेची स्थिती [ ]

4) पिल्लांना लपवून ठेवण्याची जागा [ ]

A3) i) समानार्थी शब्द लिहा 1

1) पाणी - ..............

2) मंद - ...............

ii) दिलेला प्रत्यय जोडून शब्द तयार करा. 1

1) 'भर' प्रत्यय लावून शब्द तयार करा.
रात्र - ..............

2) 'भर' प्रत्यय लावून शब्द तयार करा.
कण - ..............

A4) स्वमत 2

वाघीण व तिच्या पिल्लांची भेट हा प्रसंग शब्दबद्ध करा.

(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1 A1) चौकटी पूर्ण करा 2

1) रेखामावशीचे घर आणि काम यातिल अंतर - ☐

2) रेखामावशी राहत असलेले ठिकाण - ☐

3) रेखामावशीने झोपडीसमोर लावलेल्या झाडाचे नाव - ☐

4) रेखामावशी वापरत असलेले वाहन - ☐

"मावशी, तुम्ही राहता कुठं?"
"त्या टेकडी पल्याड", मावशी म्हणाल्या.
"इथून किती कि. मी. आहे?"
"तीन."
"तुम्ही कशा आलात इथपर्यंत?"
"गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते; पन आता माज्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते." अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते? ही फिरती तुम्ही कशी करता? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत?

रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यातलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. "आणि आता पाहा, या आहेत रेखा मावशींच्या फूटप्रिन्टस...! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली...एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले...'सिल्व्हर फूटप्रिन्टस! दि मोस्ट क्लिनली फूटप्रिन्टस!!'

"वाऽ पाहयलंत रेखामावशीचे पाय चंदेरी आहेत. एकदम स्वच्छ. झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे," सुमित ओरडला. "ह्याऽ हे भलतंच!" रेखा मावशींच्या पायाकडे पाहत पावडेकाका म्हणाले.

सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजिऱ्या तळव्यांकडे पाहयले आणि म्हणाला, "काका, आपण तुमच्यापायाचं पाहू या का?"

"त्यात पाहयचं काय? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत...!" पावडेकाका पाय सगळ्यांना दाखवत म्हणाले. "पण चला काय सांगतंय तुमचं ॲप, ते तरी पाहू या," त्यांनी पुस्ती जोडली.

A2) i) सत्य की असत्य ते लिहा 1

1) स्क्रीनवर पावडेकाकांच्या पावलांसाठी चंदेरी आकाराचा चौकोन उमटला.

2) पावडेकाकांचे पाय मऊ व स्वच्छ आहेत.

ii) एका वाक्यात उत्तर लिहा 1

पावडेकाकांचे तळवे कसे होते?

A3) i) समानार्थी शब्द लिहा 1

1) वृक्ष - ☐

2) नभ - ☐

ii) विरूद्धार्थी शब्द लिहा 1

1) स्वच्छ × ..............

2) मऊ × ..............


A4) स्वमत 2

जागतिक तापमान वाढ होत असताना सायकल हे वाहन किती फायद्याचे आहे ते लिहा.?

अपठित गदय

(इ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.


1 A1) चौकटी पूर्ण करा 2





निसर्गाचे प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते. सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा पसरलेल्या असतात. किलबिलाट करीत घरटयाकडे पक्षी परतत असतात. सकाळी भिन्न भिन्न मार्गानी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटगटाने घरटयाकडे येतात. रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुद्धा आतुरतेने घराकडे येत असतात. गाईची आचळं वासरांच्या ओढीने तुडूंब भरलेली असतात. अधीर होऊन हंबरतच त्या गोठयाकडे धावतात. तेव्हा त्यांच्या गळ्यातील तो घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याचवेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणातील लाल रंगात मिसळते आणि वातावरणाला पवित्र करते. मंद मंद वाऱ्याच्या झुळका झाडे वेलींना हिंदळवतात. हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्व विश्रांतीत रममाण होते.

A2) चौकटी पूर्ण करा 2

1)




2)




A3) i) वाक्यात विरामचिन्हांचा वापर करा 1

वाहवा किती लाल भडक सूर्यबिंब हे !

ii) लिंग बदला 1

1) गाय - ☐

2) म्हैस - ☐

A4) स्वमत 2

तुम्ही अनुभवलेल्या पहाटेचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

विभाग २ - पदय

Q.2 (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1 A1) चौकटी पूर्ण करा 2

1) व्यक्तीला सुख देणारा - ☐

2) पिलांना सुरक्षिता देणारे - ☐

3) सर्वकाळ सुखदाता- ☐

4) चिरकार टिकणारा आनंद - ☐

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी | पांखोवा जेवीं पिलियांसी |
जीवन जैसे कां जीवांसी | तेवीं सर्वांसी मृदुत्व ||
जळ वरिवरी क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ |
उदक सुखी करी एक वेळ | योगी सर्वकाळ सुखदाता ||
उदकाचें सुख तें किती | सवेंचि क्षणें तृषितें होती |
योगिया दे स्वानंदतृप्ती | सुखासी विकृती पैं नाही ||
उदकाची जे मधुरता | ते रसनेसीचि तत्त्वतां |
योगियांचे गोडपण पाहतां | होय निवविता सर्वेंद्रियां ||
मेघमुखें अध:पतन | उदकाचें देखोनि जाण |
अध:पातें निवती जन | अन्नदान सकळांसी ||
तैसे योगियासी खालुतें येणें | जे इहलोकीं जन्म पावणें |
जन निववी श्रवणकीर्तनें | निजज्ञानें उद्धरी ||

A2) तक्ता पूर्ण करा 2

खालील तक्ता पूर्ण करा योगीपुरूष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.

| योगी पुरूष | जीवन (पाणी) |
|---|---|
| | |
| | |

A3) काव्यसौंदर्य 2

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी | पांखोवा जेवीं पिलियांसी |
जीवन जैसे कां जीवांसी | तेवीं सर्वांसी मृदुत्व || या काव्यपंक्तीतील तुम्हांला समजलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

A4) स्वमत 2

योगी पुरूष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

(आ) कवितेसंबंधी खालील मुददयांना अनुसरुन कृती सोडवा. (8)

अंकिला मी दास तुझा कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (१ गुण)
२) कवितेचा रचनाप्रकार (१ गुण)
३) कवितेचा विषय (१ गुण)
४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) (१ गुण)
५) कवितेतून व्यक्त होणारा विचार (२ गुण)
६) कवितेतील आवडलेली ओळ (२ गुण)

OR

दोन दिवस कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (०१ गुण)
२) कवितेचा विषय (०१ गुण)
३) कवितेच्या कवींची / कवयित्रींची लेखन वैशिष्ट्ये (०२ गुण)
४) कवितेतून व्यक्त होणारा विचार (०२ गुण)
५) कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)

(इ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा. (4)

हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...

विभाग ३ - स्थूलवाचन

Q.3 खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. (6)

1) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणा-या मानवी भावभावना स्पष्ट करा.

2) पाठाबाहेरील उदाहरणे शोधून खालील कृती करा.

शब्द अनेक अर्थ एक — व्युत्पत्ती कोश — शब्द एक अर्थ अनेक

उदा. जल, नीर, तोय. पाणी.
उदा. पान-झाडाचे (पर्ण) पान (पृष्ठ) पुस्तकाचे पान.

3) आधी केले मग सांगितले या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

विभाग ४ - भाषाभ्यास

Q.4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.

(१) समास - (2)

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचा समास ओळखून लिहा :
i. वसंत ऋतूत रंगाची <u>उधळमाधळ</u> होते.
ii. घरी <u>मित्रमंडळींची</u> वर्दळ असते.

(२) अलंकार - (2)

खालील उदाहरण वाचून कृती करा.

पुढील ओळीतील अलंकार ओळखून कृती करा.
झाड जणू नवी नवरी

i. उपमेय - ...............
ii. उपमान - ...............
iii. साधर्म्यवाचक शब्द - ...............
iv. अलंकार - ...............

(३) वाक्यरुपांतर - (2)

वाक्याचे प्रकार लिहून वाक्याचे रूपांतर करा.

| वाक्य | | वाक्याचे प्रकार | रूपांतर |
|---|---|---|---|
| i. | या जगात त्यांच कुणी होत का ? | | (विधानार्थी) |
| ii. | गुरूजींचे निरंजनवर खूप प्रेम होते. | | (उद्गारार्थी) |

(४) सामान्यरूप लिहा - (2)

खालील अधोरखित शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहा.

| शब्द | सामाणरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|
| i. आभाळाच्या | ............. | ............. |
| ii. मजेचे | ............. | ............. |

(५) वाक्यप्रचार - (2)

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
बरबाद होणे →

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.

(१) शब्दसंपत्ती -

(i) समानार्थी शब्द लिहा. (1)

1) i. गहाण - ..............
ii. रात्र - ..............

(ii) एका शब्दाचे अनेक अर्थ लिहा.(दोन) (1)

[ ] - फूल - [ ]

(iii) विरुद्धार्थी शब्द लिहा. (1)

1) i. तुटपुंजे × ..............
ii. लक्ष × ..............

(iv) गटात न बसणारा शब्द ओळखा. (1)

i. बेल, गुलाब, रजनीगंधा, सूर्यफूल
ii. वंदन, नमस्कार, स्वागत, प्रणाम

(२) लेखननियमांनुसार लेखन -

(1) लेखननियमांनुसार बदल करा. (1)

मावसि तूला शाळेतही घालणार आहे.

(2) अचूक शब्द ओळखा. (1)

2) i. अ. स्वाक्षरी ब. स्वाक्षरि क. स्वाकसरी ड. स्वॉक्षरि
ii. अ. चॅम्पिंयन ब. चॅम्पियण क. चॅम्पियन ड. चॅमपियन

(३) विरामचिन्हे - (2)

विरामचिन्हांचा योग्य वापर करा.
दोन पिल्लं तिच्या मागोमाग निघाली होती पण दिघांना अदयाप भान नव्हतं

(४) पारिभाषिक शब्द - (1)

1) i. Daily Wages → ..............
ii. Receptionist → ..............

(५) खालील शब्द अकारविल्हे लावा. (1)

कढई / छत्री / झबला / पतंग

विभाग ५ - उपयोजित लेखन

Q.5 (अ) 1. पत्रलेखन - (5)

खालील विषयावर पत्र लिहा.

खालील कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा

तुम्ही एक सुजाण नागरिक या नात्याने तुमच्या विभागाच्या नगरसेवकांना

| | |
|---|---|
| रस्त्यावरील वीजेचे दिवे नेहमी बंद असतात म्हणून तक्रारपत्र लिहा | रस्त्यावरील वीजेचे नविन दिवे सर्वत्र विभागात लावल्यामुळे आभार पत्र |

2. सारांशलेखन -

विभाग १ - गदय प्रं.१(इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा. (5)

(आ) खालील कृति करा.

(१) जाहिरातलेखन (60 ते 80 शब्द) (6)

खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.

कूल कूल

माफक दर

आईस्क्रीम पार्लर

ठंडा – ठंडा

दर पत्रक

आस्वाद

(२) कथालेखन (80 ते 100 शब्द) (6)

खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.
(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. रामपूर नावाच्या गावात श्रीधर नावाचा जमीनदार राहत होता. जवळ- जवळ अर्धे गाव त्याच्या मालकीचे होते. भरपूर नोकर त्याच्या शेतात राबत होते. तो नोकरांशी अतिशय प्रेमाने वागे. त्यांना वेळेवर पगार देई. तरीही तो एका चिंतेने ग्रासलेला होता. इतके नोकर असताना आपल्याला उत्पन्न कमी का मिळते? हे त्याला समजत नव्हते. श्रीधरचा एक जीवाभावाचा मित्र होता. त्याचे नाव वासुदेव होते. श्रीधरच्या आयुष्यात कोणतीही समस्या निर्माण झाली की तो वासुदेवशी चर्चा करत असे. शेतावर इतके नोकर असताना उत्पन्न कमी कसे? हा विषय सुद्धा चर्चेसाठी आला.

(इ) लेखनकौशल्य (8)

खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)

1)

अभयारण्याचे नाव

सफरीसाठी वापरलेले साधन

अभयारण्यातील सफर अनुभव

पक्षी व प्राण्यांची माहिती

पाहताना आलेले अनुभव


2) जुन्या किल्ल्याचे आत्मवृत्त :

किल्ल्याचे दर्शन



रायगड दर्शन

महाराजांची अंधारातील समाधी



शिवरायांची देशनिष्ठा